**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन), अधिनियम, २०१७ नुसार नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता काढून टाकण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय, क्र.- एमएसए ०२/ २०१९/ प्र. क्र. ३३ (भाग-१)/ कामगार - १०**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २ मार्च, २०१९.

<u>वाचा</u> - १) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन), अधिनियम, २०१७.
२) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन), नियम, २०१८.

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन), अधिनियम, २०१७ च्या कलम ६ (३) व ६ (४) मध्ये या अधिनियमांतर्गत देण्यात आलेल्या नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याची मुदत दहा वर्षांची असल्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. तसेच या अधिनियमांतर्गत नियम ६ व ७ मध्ये नोंदणी दाखल्याचे नुतनीकरण करण्याबाबतचे नियम करण्यात आले आहेत. राज्याने दुकाने व आस्थापना अधिनियमांतर्गत नोंदणी दाखल्याचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता काढून टाकण्यात यावी, अशी केंद्र शासनाच्या औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागाने (डीआयपीपी) शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने दुकाने व आस्थापना अधिनियमांतर्गत नोंदणी प्रमाणपत्र नुतनीकरण करण्याची अट काढून टाकण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन), अधिनियम, २०१७ च्या कलम ४ मध्ये शासनास या अधिनियमातील कोणत्याही आस्थापनेस किंवा कोणत्याही वर्गवारीतील आस्थापनांना किंवा कामगारांना किंवा व्यक्तींना कोणत्याही तरतूदीतून सूट देण्याचे अधिकार आहेत. उक्त अधिनियमाच्या उपरोक्त कलम ४ (१) च्या तरतूदीन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये नोंदित करण्यात येणा-या सर्व आस्थापनांना दहा वर्षांनी नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याच्या तरतूदीतून सूट देण्यात येत आहे. त्यानुसार महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन), अधिनियम, २०१७ अधिनियमाच्या कलम ६ अन्वये नोंदित सर्व आस्थापनांना नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता यापुढे राहणार नाही.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०३०५१६४९५६८९१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MAHENDRA KALYANKAR

Digitally signed by MAHENDRA KALYANKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=63a1e1974ba057de0816c577e58a37332a1706ebf892276aa7494a9a621d5b74, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=INDUSTRY AND ENERGY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MAHENDRA KALYANKAR
Date: 2019.03.05 16:54:04 +05'30'

**( डॉ. महेंद्र कल्याणकर )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई § ४०० ०५१.
५. अवर सचिव (कामगार -९), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
६. निवड नस्ती (कामगार-१०).